**सन २०१९-२० करीता इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) योजनेंतर्गत मौ.बोपगांव (कानिफनाथ) या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांकरिता निधी वितरण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.२३३/फ-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
**दिनांक :- ०९ जूलै, २०१९**

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.५७/ब-१, दि.०१.०४.२०१९
३. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष- १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४४/४५८/२०१९-२०, दिनांक २५.०६.२०१९
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-२/(यो)/बोपगांव/१३०/१९-२०, दिनांक २५.०६.२०१९

प्रस्तावना :-

सन २०१९-२० राज्य योजनेअंतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत रुपये ५६००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत असून त्यापैकी निसर्ग पर्यटनाकरिता रु.३०००.०० लक्ष इतका निधी मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये मागणी क्र.सी-७, २४०६-वनीकरण व वन्यजीवन" या मुख्य लेखाशीर्षाखाली दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१९-२० करिता (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर व अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या अनुषंगाने ०१-वेतन रु.१५.०० लक्ष पैकी रु.५.०० लक्ष, ०२-मजूरी रु.१२००.०० लक्ष पैकी रु.४००.०० लक्ष, ११- देशांतर्गत प्रवास खर्च रु.१.०० लक्ष पैकी रु.०.३३ लक्ष, २१-पुरवठा व सामग्री रु.७५०.०० लक्षपैकी रु.२५०.०० लक्ष, २७-लहान बांधकामे रु.३३०.०० लक्ष पैकी रु.११०.०० लक्ष, ५०-इतर खर्च रु.३३०४.०० लक्षपैकी रु.११०१.३३ लक्ष व ५३-मोठी बांधकामे रु.०.०० असा एकूण रु.५६००.०० लक्षपैकी रु.१८६६.६६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. म्हणजेच निसर्ग पर्यटनाकरीता रु.३०००.०० लक्षपैकी रु.९९९.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत आतापर्यंत विविध शासन निर्णयान्वये रु.१५६.२१४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून,रु.८४३.४२६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

मौ.बोपगांव (कानिफनाथ) या पर्यटन स्थळांचा आराखडा दिनांक १९.०९.२०१५ ला झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या तज्ञ समितीच्या सभेत सन २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षासाठी मंजूर झालेला असून, आराखडयाची एकूण किंमत रु.४०७.०९ लक्ष आहे. सदर पर्यटन स्थळांकरिता सन २०१५-१६ मध्ये रु.८३.८३ लक्ष, २०१६-१७ मध्ये रु.२०.१५ लक्ष,२०१७-१८ मध्ये रु.१७.५७ लक्ष व २०१८-

१९ मध्ये रु.१३.१९ लक्ष निधी वाटप करण्यात आलेला आहे. मौ.बोपगांव (कानिफनाथ) या पर्यटन स्थळाकरीता सन २०१९-२० करीता रु.३.२० लक्षचा चालू बाब प्रस्ताव संदर्भ क्र.४ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी शिफारशीसह सादर केला आहे. सदर प्रस्ताव संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावास शासन मंजूरी प्रदान करुन BDS द्वारे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावातील कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्र.३ नुसार सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील परिपत्रक व संदर्भ क्र.२ चा शासन निर्णय विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांचे नियंत्रणाखालील मौ.बोपगांव (कानिफनाथ) या निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी सन २०१९-२० करीता सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये नमुद केलेल्या कामाकरिता **रु.३.२० लक्ष** इतका निधी राज्य योजनेअंतर्गत इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे.
२. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
३. नियंत्रक प्राक्कलन अधिकाऱ्यांनी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या मुदतीत त्यांच्याकडे सुपुर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
४. नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, एकूण वितरीत केलेल्या/करण्यात येणाऱ्या तरतूदीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
५. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
६. संस्थेने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर व वितरीत अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमित ठेवावा.
७. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
८. संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता

वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

९. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.

१०. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

११. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांनी निसर्ग पर्यटन स्थळातील सदर कामांच्या अंदाजपत्रकांची पडताळणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करुन घ्यावी.

१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरीता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

१३. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

१४. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१५. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.

१६. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ चे परिपत्रकातील अटींची व महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१७. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०९१६४६३७९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO
DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d
8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8
936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.07.09 16:54:27 +05'30'

**( सुजय दोडल )**
**सह सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
७. वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

**"प्रपत्र - अ"**

**शासन निर्णय क्र.निसप-२०१९/प्र.क्र.२३३/फ-९, दिनांक ०९ जूलै, २०१९ सोबतचे प्रपत्र-अ**

| मौ.बोपगांव (कानिफनाथ) निसर्ग पर्यटन स्थळ | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **बाब निहाय कामे** | **सन २०१९-२० करीता प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)** |
| १ | मौ.बोपगांव फॉ.क्र.नं.५४८ मधील कानिफनाथ मंदीर परिसराचे संरक्षण व देखभाल करणे तसेच हिरवळ देखभाल व पाणी देणे | ३.२० |
| | **एकूण :-** | **३.२०** |

******************